**सन २०१६ यावर्षी पिकांचे नुकसान होऊ नये याकरिता कृषीपंपाना १२ तासांचा थ्री फेज वीज पुरवठा केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्याबाबत व महावितरण कंपनीस अनुदान देणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३६५/ऊर्जा-५**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : ०५ जानेवारी, २०१८.

**प्रस्तावना :**

सन २०१४-१५ व २०१५-१६ या दोन्ही वर्षी पावसाच्या अत्यल्प प्रमाणामुळे राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. तद्नंतर सन २०१६ च्या माहे जून व जुलै मध्ये राज्यात सर्वत्र बऱ्याच प्रमाणात पाऊस झाल्यामुळे व तो शेतीसाठी उपयुक्त असल्याने मोठया प्रमाणावर पेरणी देखील झाली. त्यानंतर माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये पावसाने दडी मारल्यामुळे राज्यातील उभी पिके करपून जाण्याच्या मार्गावर होती. संबंधित शेतकऱ्यांना पीकहानीमुळे आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागणार होते. तसेच पिकांच्या उत्पादनामध्ये प्रचंड तूट सुध्दा निर्माण होण्याची शक्यता होती. जून-जुलै २०१६ मध्ये राज्यातील काही भागांमध्ये झालेल्या पावसामुळे नदी-तलावांमध्ये उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध होता. त्याचा शेती सिंचनासाठी वापर वेळेत होणे आवश्यक होते. तसेच शासनाच्या जलयुक्त शिवार अभियानामुळेही बऱ्याच गावी शेतबंधारे व शेततळयांमध्ये पाणी उपलब्ध होते. शेतीसाठी सदरचे पाणी, ८/१० तासांच्या वीज उपलब्धतेमुळे पुरेशा प्रमाणात वापरता येत नव्हते. त्यामुळे सदर विभागामध्ये, कृषी पंपासाठी सध्याच्या ८/१० तासांच्या प्रचलित धोरणात तातडीने बदल करुन सलग १२ तास वीज उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी राज्यातील विविध भागातील लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी शासनाकडे केली होती. त्यानुसार राज्यातील पीक परिस्थितीनुसार कृषीपंपाना १२ तास थ्री फेज अतिरिक्त वीज पुरवठा देण्याची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत करण्यात आली. सदर कार्यवाहीस तसेच सदर अतिरिक्त वीजपुरवठा देण्यासाठी महावितरण कंपनीस आलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी कंपनीस अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याकरिता दिनांक २८नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीतयाबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने पुढील निर्णय घेतले आहेत.

**शासन निर्णय :**

(१) राज्यातील कृषीपंपाना दिनांक ०८.०९.२०१६ ते १५.१२.२०१६ तसेच भंडारा, गोंदिया व ब्रम्हपूरी भागातील कृषीपंपाना दिनांक ०३.०३.२०१७ ते १५.०५.२०१७ या कालावधीत महावितरण कंपनीमार्फत १२ तास थ्री फेज वीजपुरवठाकेलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

(२) सदर कालावधीतील वाढीव वीजपुरवठयासाठी महावितरण कंपनीस आलेल्या अतिरिक्त खर्च रुपये ११५४.०३ कोटी या रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी महावितरण कंपनीस कर्जरुपाने निधी उभारण्याची परवानगी देण्यात येत आहे. सदर निधी उभारण्यासाठी राज्य शासनाची हमी देण्यात यावी. तसेच कर्जावरील व्याजाच्या रक्कमेसाठी महावितरण कंपनीस शासनाकडून अनुदान देण्यात येईल. त्याकरिता अर्थसंकल्पात दरवर्षी योग्य ती तरतूद करण्यात यावी. सदर कर्जाच्या परतफेडीसाठी आवश्यक असणारा निधी राज्य शासनामार्फत महावितरण कंपनीस उपलब्ध करुन दिला जाईल.

२. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौ.संदर्भ क्र. २५६/१७/व्यय-१६ दिनांक २८.१२.२०१७अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८०१०६१२३५०००६१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2018.01.06 12:38:13 +05'30'

**( भि. य.मंता )**
**शासनाचे उपसचिव**

**प्रत:**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानभवन, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मंत्रालयीन विभाग
८. सचिव,महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर नं. १,१३वा मजला,कफ परेड, मुंबई ०५.
९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर
११. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१४. अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.